# मोदी सरकारच्या ९ व्या वर्षपूर्तीनिमित्त भाजपाची ८० कोटी लोकांपर्यंत पोहोचण्याची योजना

## भाजपा राष्ट्रीय सरचिटणीस विनोद तावडे यांची माहिती

**मुंबई, दि. ३० ( प्रतिनिधी ) :** मोदी सरकारला ९ वर्षे पूर्ण झाल्यानिमित्त भारतीय जनता पार्टीतर्फे देशभर महाजनसंपर्क अभियान राबविण्यात येणार असून या द्वारे ८० कोटी लोकांपर्यंत मोदी सरकारची कामगिरी पोहोचवली जाणार आहे. राष्ट्रीय अध्यक्ष जगत प्रकाश नड्डा यांच्या नेतृत्वाखाली होणाऱ्या या अभियानात केंद्रीय मंत्री, भाजपा शासित राज्यांचे मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री, राष्ट्रीय पदाधिकारी असे २२७ प्रमुख नेते लोकसभेच्या सर्व मतदारसंघात प्रवास करणार असल्याची माहिती भाजपा चे राष्ट्रीय सरचिटणीस विनोद तावडे यांनी मंगळवारी दिली. भाजपा प्रदेश कार्यालयात झालेल्या पत्रकार परिषदेत ते बोलत होते. भाजपा प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे, प्रदेश उपाध्यक्ष माधव भांडारी, प्रदेश सरचिटणीस विक्रांत पाटील, अभियानाचे प्रदेश संयोजक आ. प्रवीण दरेकर, सह संयोजक कृपाशंकर सिंग, प्रदेश कोषाध्यक्ष आ. मिहीर कोटेचा , मुख्य प्रवक्ते केशव उपाध्ये , माध्यम विभाग प्रमुख नवनाथ बन आदी उपस्थित होते. ३१ मे रोजी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या अजमेर येथे होणाऱ्या सभेने अभियानाला प्रारंभ होणार असल्याचेही त्यांनी सांगितले.

तावडे यांनी सांगितले की, ३० मे ते ३० जून या काळात होणाऱ्या या महाजनसंपर्क अभियानात मोदी सरकारच्या विविध योजनातील लाभार्थींचे संमेलन, प्रबुद्ध संमेलन, जनसंघापासून काम करणाऱ्या ज्येष्ठ कार्यकर्त्यांच्या भेटीगाठी असे अनेक कार्यक्रम होणार आहेत. प्रत्येक लोकसभा मतदार संघात समाजातील मान्यवर, प्रभावशाली व्यक्ती , पद्म पुरस्कार, खेल पुरस्कार व अन्य महत्वाचे पुरस्कार प्राप्त व्यक्ती अशा सुमारे साडेपाच लाख मान्यवरांना 'संपर्क ते समर्थन' या कार्यक्रमाअंतर्गत व्यक्तिगत भेटून त्यांच्यापर्यंत मोदी सरकारची कामगिरी पोहोचवली जाणार आहे. विचारवंतांबरोबर त्या लोकसभा मतदारसंघात प्रवास करणारे राष्ट्रीय नेते, केंद्रीय मंत्री हे गेल्या ९ वर्षातील देशाच्या प्रगतीबाबत विचारमंथन करतील. तसेच जनसंघापासून भाजपामध्ये काम करणारे वरिष्ठ कार्यकर्ते ,भाजप विचाराला समर्थन देणारे अन्य संस्थांचे कार्यकर्ते यांच्याशीही केंद्रीय मंत्री,राष्ट्रीय नेते संवाद साधतील. अभियानाच्या शेवटच्या १० दिवसात प्रत्येक मतदारसंघात मोदी सरकारच्या ९ वर्षातील कामगिरीची पुस्तिका घरोघरी पोहोचवली जाणार आहे.

या महाजनसंपर्क अभियानादरम्यान पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या सुमारे १२ सभांचे आयोजन करण्यात येईल. याचबरोबर राष्ट्रीय अध्यक्ष जगत प्रकाश नड्डा, केंद्रीय गृहमंत्री अमितभाई शाह, संरक्षण मंत्री राजनाथ सिंह, केंद्रीय रस्ते मंत्री नितीन गडकरी, केंद्रीय मंत्री स्मृती इराणी व अन्य नेत्यांच्या सभांचे आयोजन करण्यात आले आहे. भाजपाच्या युवा, महिला, अनुसूचित जाती – जनजाती आणि शेतकरी अशा वेगवेगळ्या आघाड्यांमार्फत सभांचे आयोजन करुन त्या त्या घटकाला ९ वर्षांच्या काळात काय मिळाले याची माहिती देण्यात येईल, असेही श्री. तावडे यांनी नमूद केले. श्री. तावडे यांनी सांगितले की,२३ जून रोजी जनसंघाचे संस्थापक डॉ.श्यामाप्रसाद मुखर्जी यांच्या 'बलिदान दिनी' पंतप्रधान नरेंद्र मोदी देशभरातल्या १० लाख बूथवर ऑनलाईन सभेने संबोधित करतील. दोनतृतीयांश पेक्षा अधिक लोकसंख्येपर्यंत पोहोचण्याचे नियोजन या अभियानाच्या माध्यमातून करण्यात आले आहे. देशातील जनतेने याला भरभरुन प्रतिसाद द्यावा, असे आवाहनही तावडे यांनी यावेळी केले.

---

## राज्यातील ४२४ अंगणवाड्या दत्तक घेण्यासाठी चार सामाजिक संस्थांशी सामंजस्य करार

**मुंबई, दि. ३० ( प्रतिनिधी ) :** राज्यातील विविध सामाजिक संस्थांच्या माध्यमातून ४२४ अंगणवाड्या दत्तक देत आहोत. तसेच पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या जयंतीनिमित्त शासनातर्फे राज्यातील २७,८९७ ग्रामपंचायती मधील ५५,७९७ कर्तबगार महिलांचा सन्मान करण्यात येणार आहे, अशी माहिती महिला व बालविकास मंत्री मंगलप्रभात लोढा यांनी दिली. सह्याद्री अतिथी गृह येथे आयोजित सामंजस्य कराराप्रसंगी महिला व बालविकास मंत्री लोढा बोलत होते. यावेळी महिला व बालविकास विभागाच्या प्रधान सचिव आय. ए.कुंदन,एकात्मिक बाल विकासच्या आयुक्त रूबल अग्रवाल, उपआयुक्त विजय क्षीरसागर, विपला फाऊंडेशन, ग्रामसेवा प्रतिष्ठान, स्पर्श चॅरिटेबल ट्रस्ट, कार्बेट फाऊंडेशनचे प्रतिनिधी उपस्थित होते. मंत्री लोढा म्हणाले, पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या जयंतीनिमित्त राज्यातील २७,८९७ ग्रामपंचायती मधील दोन कर्तबगार महिलांचा सन्मान करण्यात येणार आहे. राज्यात १ लाख १० हजार ४४६ अंगणवाड्या कार्यरत आहेत. राज्याच्या महिला आणि बाल विकास विभागाने लोकसहभागातून 'अंगणवाडी दत्तक' धोरण आणले आहे. सर्वच अंगणवाड्यांचा विकास व्हावा यासाठी शासन प्रयत्नशील आहे.४ आक्टोबर २०२२ रोजी अंगणवाडी दत्तक धोरणासंदर्भात शासनाने सूचना निर्गमित केल्या होत्या. या धोरणांतर्गत कॉर्पोरेट संस्था, कॉर्पोरेट सामाजिक दायित्व निधी, अशासकीय स्वयंसेवी संस्था, ट्रस्ट इ. आणि व्यक्ती, कुटुंब आणि समूहांच्या माध्यमातून गुंतवणूक करू शकतात. शासन अंगणवाड्यांच्या बळकटीकरणासाठी विविध योजना राबवत आहे. अंगणवाडी दत्तक धोरण अंतर्गत ४ ऑक्टोबर २०२२ पासून विविध १५६ सामाजिक संस्थांनी आतापर्यंत ४,८६१ अंगणवाड्या दत्तक घेतल्या आहेत. आज विपला फाऊंडेशनने पालघर, ठाणे आणि रायगड जिल्ह्यातील ३६८, ग्रामसेवा प्रतिष्ठानने रायगड आणि ठाणे मधील ३०, स्पर्श चॅरिटेबल ट्रस्टने मुंबई उपनगर आणि नाशिक मधील १०, कार्बेट फाऊंडेशनने सिंधुदुर्ग आणि पुणे मधील १६ अंगणवाड्या क्षमता वृद्धीसाठी दत्तक घेतल्या आहेत.

---

## दक्षिण भारतातील सर्वात मोठया सनप्युअरकडून आरोग्य व शुद्धतेच्या महत्त्वाला अधिक दृढ करण्यासाठी मोहिम

**मुंबई, दि. ३० ( प्रतिनिधी ) :** दक्षिण भारतातील सर्वात मोठा खाद्यतेल ब्रॅण्ड सनप्युअरने खाद्यतेलामधील पाच आरोग्यविषयक वैशिष्ट्ये आणि ब्रॅण्डची मुलभूत मूल्ये शुद्धता, स्वास्थ्य, दर्जा, केअर व प्रामाणिकपणा यांना दृढ करणारी नवीन विपणन मोहिम #Fantastic5WithSunpureच्या लाँचची घोषणा केली. वर्षभर राबवण्यात येणारी व बहुभाषिक मोहिम ऑफलाइन व ऑनलाइन चॅनेल्ससह सोशल मीडिया व डिजिटल व्यासपीठांवर प्रसारित करण्यात येईल.

सनप्युअरच्या पूर्वीच्या यशस्वी मोहिमेला कायम राखत मोहिम #Fantastic5WithSunpure ब्रॅण्डच्या अपवादात्मक उत्पादनांच्या माध्यमातून आरोग्य व दर्जाला चालना देण्याच्या थीमवर सादर करण्यात आली आहे. लक्षवेधक जाहिरात मोहिमेचा सनप्युअर सनफ्लॉवर ऑईलच्या अद्वितीय दर्जावर प्रकाश टाकण्याचा, तसेच या ऑईलचा व्यक्ती व त्यांच्या कुटुंबांवर पडू शकणाऱ्या अनुकूल परिणामाला दाखवण्याचा मनसुबा आहे.

या मोहिमेबाबत आपले मत व्यक्त करत एम के ॲग्रोटेक प्रा. लि.चे राष्ट्रीय विक्री प्रमुख गोकरण पवार सिंग म्हणाले, "या मिशनसह आमचे व्यक्ती व कुटुंबांना आरोग्यदायी व समाधानकारक जीवन जगण्यास सक्षम करण्याचे ध्येय आहे. आम्हाला दर्जा, शुद्धता व सर्वोत्तमतेचा समावेश असलेले उत्पादन सनप्युअर सनफ्लॉवर ऑईलची उल्लेखनीय वैशिष्ट्ये दाखवण्याचा अभिमान वाटतो.

---

## वसुली अधिकारी

**(महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० महाराष्ट्र सहकारी संस्था नियम, १९६१ अन्वये)**

वसई विकास सहकारी बँक लि. (शेड्युल्ड बँक ) मुख्य कार्यालय, चिमाजी आप्पा मैदानासमोर, वसई गाव एस. टी.स्टेड जवळ, वसई रोड (प), पालघर. ४०१२०१

**दूरध्वनी कं.**२२६२८४ / २३२६९९८ **मो.** ९८२२२४९७६६०

## जाहीर लिलाव

वसुली अधिकारी द्वारे सर्व जनता आणि विशेषता खालील नमुद कर्जदार व सदर कर्जास जामिन असलेल्या जामिनदारांना सुचना देण्यात येत आहे की, महाराष्ट्र सहाकारी संस्था अधिनियम १९६० च्या तरतुदी अंतर्गत मा. उप निबंधक, सहकारी संस्था, वसई यांनी दिलेल्या वसूली प्रमाणकांच्या अंमलबजावणी दरम्यान वसई विकास सहकारी बँक ली कडे तारण असलेल्या खालील नमुद स्थावर मालमत्तेची थकबाकीदार देय रक्कम व त्यावरील व्याज इतर खर्च व शासकीय अधिभार अभी एकूण रक्कम संबंधीत कर्जखात्यांची देय रक्कम वसूल करण्याकरिता जप्त मालमत्तेचा जाहिर लिला दिलेल्या तारखेस "जसे आहे. जेथे आहे जे आहे" या तत्वावर करण्यात येणार आहे.

- कर्जदाराचे नाव व कर्जखाते श्री. तुषार तुकाराम फडाले (MORGLN / 7990)
- वसुली दाखला व रक्कम : २६/२०२१ रक्कम ५०३,५७२/- दि. २२/०३/२०२०
- लिलावास काढण्यात आलेल्या स्थावर जंगम मालमत्तेचे वर्णन : रहीवाशी सदनिका के सी /०१

(अंदाजे छत्र ५९० चौ. फु.), तळ मजला, सी विंग "यशोधन आपार्टमेंट, आगाशी रोड, बोळींज, विरार (पश्चिम), ता. वसई, जि. पालघर.

- वाजवी रक्कम : ३४,१७,१५५/-
- अनामत रक्कम : रु ३,४०,०००/-
- लिलावाचे स्थळ लिलाव तारीख व वेळ : वसई विकास सहकारी बँक लि. मुख्यकार्यालय, चिमाजी आप्पा मैदान समोर, वसई गाव एस. टी. स्टॅंड जवळ (प). येथे १ जुलै २०१३ योजी सकाळी 11.00 वाजता.

मालमत्तेचे काढण्यात आलेल्या स्थावर मालमत्तेवरील इतर भार आजतगायत आढळले नाहीत. सदर मालमत्ता "जसे आहे, जेथे आहे व जे आहे" या तत्वावर व बँकेला ज्ञात अज्ञात सर्व विद्यमान आणि भविष्यातील बोजासहीत विकण्यास येणार आहे.

मालमत्तेचे लिलावासंदर्भात अटी शर्ती असणारे बोलीपत्र निम्न स्वाक्षरीकार यांच्या कार्यालयात दि. १२.०६.२०२३ ते २८.०६.२०२३ रोजी रु.२०००/- रोख रक्कन (विना परतावा) भरून प्राप्त होऊ शकेल. लिलावातील खोलीपासोबत के. वाय. सी. कागदपत्रे नमुद केलेली अनामत रक्कम कि ३०.०६.२०२३ दु. १२.०० वाजेपर्यंत जमा करणे आवश्यक आहे. कोणतेही कारण न दर्शविता, निविदा किंवा बोली स्विकारणे किंवा नाकारणे किंवा लिलाव स्थगित / निलंबित / रद्द करण्याचा अधिकार, तसेच कोणत्याही पूर्व सूचनेशिवाय, विक्रीचे कोणतेही नियम व अटी बदल करण्याचा अधिकार, निम्म स्वाक्षरीकार यांनी राखुन ठेवला आहे.

वर वर्णन केलेल्या मिळकतीच्या टायटलबाबत अगर मिळकत मालक, कर्जदार या इतर यांचे मिळकतीबाबत कोणाची, कोणत्याही प्रकारची हरकत अगर तक्रार असल्यास तसेच सदरची मिळकत कोणाकडे गहाण, दान, लीज सबलीज बक्षीसपत्र, मुखत्यारपत्र, करार, इत्यादी कारणाने बोजाअसल्यास अगर कोणाचा काही हक्क व अधिकार असल्यास त्यांनी ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १० दिवसाच्या आत आमचे कार्यालयात योग्य त्या लेखी पुराव्यासह हरकती नोंदवाव्यात. मुदतीत कोणाची कोणत्याही प्रकारची हरकत अगर तक्रार न आल्यास कळकत निर्वेध समजुन विक्री केली जाईल. परस्पर वर्तमानपत्रात प्रसिध्द केलेल्या हरकतीचा विचार केला जाणार नाही. नोटीस हरकत मुदतीनंतर कोणाचीही कोणत्याही प्रकारची तक्रार विचारात घेतली जाणार नाही.

**सही/-**
**वसुली अधिकारी**
**म. स. का. १९६० कलम १५६ अन्वये**

---

## CHANGE OF NAME

I Parvati Spouse of Late **Raghunath Kondiram Mhamunkar** resident of Nanemachi, Post. Waki Bu., Tal. Mahad, Dist. Raigad Maharashtra - 402302. Have changed my name from Parvatibai to **Parvati Raghunath Mhamunkar** vide affidavit No. 23520418512686001700 17 dated 03/04/2023

---

## जाहीर नोटीस

याद्वारे सर्व संबंधित कळविण्यात येते की, गाव मौजे तुळींज, वसई विरार शहर महानगरपालिका हद्दीतील ता. वसई, जि.पालघर येथील स.नं. 62 नवीन हि नं 1 या जमीनीवर बांधलेली इमारत ज्याला **"सूर्या को.ऑ. हा.सो.लि."** असे संबोधले जात. या इमारतीतील एक रुम / फ्लॅट. नं 08, पहिला मजला, असे आहे. ज्याचे शेयर सर्टिफिकेट नं. 08, ज्याचे डिस्टेक्टीव्ह.नं. 36 ते 40 असे आहे. असे फ्लॅट व शेयर कै. जयरामभाई पी टांक यांच्या मालकी कब्जा वहिवाटीची होती व सोसायटीमध्ये त्यांच्या नांवे दाखल होते. व ते दिनांक 20/12/2010 रोजी मयत झाले. व त्यांची पत्नी प्रभाबेन जयरामभाई टांक हे दि. 23/5/2010 रोजी मयत पावली व त्यांचा मोठा मुलगा शांतीलाल जे टांक हे दि. 23/10/2022 रोजी मयत पावले व वरील सर्वांनाचा मत्यूनंतर खालील प्रमाणे सदर रूम व शेयर चे इसम वारस झाले आहे.

सदर रूम व शेअर चे वारस असे आहे शारदा शांतीलाल टांक, हर्ष शांतीलाल टांक, रिमा शांतीलाल शाह, प्रदिप जयरामभाई टांक, अनिल जयरामभाई टांक, चंद्रिका जयरामभाई टांक उर्फ चंद्रिका अमृतलाल राठोड, लिनाबेन उर्फ ललिता बी परमार हे वरील रूम व शेयर चे वारस आहे.

तसेच बिल्डर व मेलोक कूटीनो यांचा मध्ये झालेला लिखाण / करार ने विकत दिलेले करार, तसेच मेलोक कूटीनो यांनी सदर रूम सबंधी श्री रमेश ए शाह यांचा मध्ये झालेला विक्री चा करार, तसेच रमेश ए शाह यांनी भावना उर्फ भारती किरण रावल यांचा मध्ये झालेले दिनाक 02/05/1996 चे करार हे वसई 2 येथे दस्त क्र 1439/1996 रोजी 14/2/1996 रोजीचे कराराने विकत दिले होते हे सर्व मूळ दस्त व पावती हे कुठतरी हरवले आहे. ज्योच मि एन सी क्र 15332/2023 असे आहे.

वरील वारस हे सदर फ्लॅट विकत आहे. तरी सदर नोटीसद्वारे असे कळविण्यात येत आहे कि जर कोणासही वरील रूम व दस्त/करारा मध्ये कुठल्याही प्रकाराचे हक्क, हिस्सा हिंतसबंध असेल तरी हि नोटीस प्रसिध्द झाल्यानंतर 14 दिवसाचा आत योग्यता कागदपत्रासह खालील पत्तवर कळवावा, नाही तर कुठल्याही हक्क, हिस्सा हितसबंध नाही असे समजून विक्री व्यवहार पूर्ण करण्यात येईल कृपया यांची नोंद घ्यावी.

**सही/-**
**श्री. एम. एम. तिवारी**
दिनांकः ३१/०५/२०२३ **(वकील उच्च न्यायालय)**
ऑफीस पत्ता : तिवारी नगर, रुम.नं. 4, तुळींज रोड, नालासोपारा (पुर्व).

---

## जाहीर नोटीस

जाहिर नोटीस प्रसिध्द करण्यांत येते की, माझे अशिल श्री गौरव गर्ग हे मौजे चाकण गट कं. १४३८ व १४४९ एक्झर्बिया आयफिल सिटी या मधील मंजुर लेआउट मधील बिल्डींग नं. ए ३ फलॅट नं. २०३, दुसरा मजला मजलायांसी क्षेत्र ४२. ७४ चौ. मी म्हणजेच ४६० चौ. मी कारपेट ओरिआ सदरहू सदनिका यांनी नोंदणीकृत करारनाम्यानुसार कायमस्वरूपी विकत घेतलेली आहे.

तरी सदरहू सदनिकेच्या कागदपत्रांतील दिनांक ०३.१०.२०१६ रोजी में. एक्झर्बिया चाकण डेव्हेलपर्स प्राईवेट लि. तर्फे व मे. संगम रेअलिटीचे भागीदार श्रीमती. संगिता संतोष बन्साली यांच्याकडुन नोंदणीकृत करारनामा सह दुय्यम निंबधक खेड कं. ३ दस्त कं. ५२१७.२०१६ रोजी विकत घेतलेली आहे तसेच सदरहू करारनामा गहाळ झालेला आहे सदरहू मुळकरारनाम्यांचा शोध घेतला असता ते मिळून आलेले नाहीत.

तरी, माझे अशिल तमाम जनतेस विंनती पुर्वक कळवितात की, जर कोणत्याही व्यक्तीस वरील नमुद कागदपत्रांच्या मुळप्रत आढळून आल्यांस किंवा मिळाल्यास ही नोटीस जाहिर होताच ७ दिवसांच्या आत खालील पत्यांवर कळवावे किंवा आणून दयावे.

**सही/–**
**ॲड. तनुजा ना. लोमटे.**
पत्ता. गाळा कं. ०५, विनायक
विल्ला बिल्डींग को. ऑप. हौ. सो.
लि., प्लॉट नं. ६९, सेक्टर. ४,
करंजाडे, ता. पनवेल, जि.
रायगड. ४१०२०६.
फोन नं. ७७३८००९५०६.

---

## CORRIGENDUM

This is in reference to the above client, public Notice ad published in Pratahkal-Mumbai on 30-5-23 on page no.5, in the matter of late Pundalik Bhaika Bodade by mistake the daughter's name is written wrong and should read as Mrs. Swati Nachiket Bhanose (श्रीमती. स्वाती नचिकेत भानोसे) Since it's a legal ad. Kindly look into the matter, please provide a free make good (Corrigendum) on 31/05/2023 Must with proper name in (श्रीमती. स्वाती नचिकेत भानोसे)

---

## सन्मीत इन्फ्रा लिमिटेड

**सीआयएन :** L70109MH2000PLC288648
नोंदणीकृत कार्यालय : ६०१, मखिजा रोयाल, ६ वा मजला, एस. व्ही. रोड, खार (प),
मुंबई महाराष्ट्र ४०० ०५२, दूर. ०२२–६७४२९१०० फॅक्स : ०२२–६७४२९१२३
ई–मेल : info@sanmitinfra.com वेबसाइट : www.sanmitinfraltd.com

**दि. ३१ मार्च, २०२३ रोजी संपलेल्या तिमाही अखेरकरिता लेखापरिक्षीत वित्तीय निष्कर्षाचा अहवाल**

| विवरण | स्वतंत्र (लाखात) | | |
|---|---|---|---|
| | तिमाही अखेर | वर्ष अखेर | तिमाही अखेर |
| | ३१.०३.२०२३ | ३१.०३.२०२३ | ३१.०३.२०२२ |
| कार्यचलनातून एकूण उत्पन्न (निव्वळ) | ४,०२१.९० | १४,३५०.६९ | ३,८७६.२८ |
| करपूर्व सामान्य उपक्रमातून निव्वळ नफा/(तोटा) | ४५०.४५ | ६६७.२४ | १५४.०२ |
| करपश्चात सामान्य उपक्रमातून निव्वळ नफा/(तोटा) | ३१५.२७ | ५१६.७९ | ११०.२९ |
| करपूर्व कालावधीकरिता निव्वळ नफा/तोटा (अतिविशेष बाबींपश्चात) | ४५०.४५ | ६६७.२४ | १५४.०२ |
| कर पश्चात कालावधीकरिता निव्वळ नफा/(तोटा) (अतिसामान्य बाबी पश्चात) | ३१५.२७ | ५१६.७९ | ११०.२९ |
| प्रदानित भाग भांडवल (रु. १/– प्रति इक्विटी शेअर दर्शनी मूल्य) | १,५८०.०८ | १,५८०.०८ | १,५८०.०८ |
| राखीव (गत वर्षाच्या ताळेबंदामध्ये निर्देशित महसूल राखीव वगळता) | – | १,५९४.०५ | १,१३४.३७ |
| प्रति शेअर उत्पन्न (अतिविशेष बाबींपूर्व) (रु. १/– प्रत्येकी) | | | |
| मूळ | ०.२० | ०.३३ | ०.०७ |
| सौम्य | ०.२० | ०.३३ | ०.०७ |
| प्रति शेअर उत्पन्न (अतिविशेष बाबींपश्चात) (रु. १/– प्रत्येकी) | | | |
| मूळ | ०.२० | ०.३३ | ०.०७ |
| सौम्य | ०.२० | ०.३३ | ०.०७ |

टीप :
१. गत वर्ष/ कालावधीची आकडेवारी पुन्हा करण्यात/पुन:निर्देशित करण्यात आली आहे.
२. वरील अहवाल लेखा समिती द्वारे पुन:निर्धारित करण्यात आला आहे व दि. २९ मे, २०२३ रोजी आयोजित संबंधित सभेमध्ये संचालक मंडळाद्वारे मंजूर केला आहे.

**सन्मीत इन्फ्रा लिमिटेडकरिता**
**सही/–**
**संजय मखीजा**
**व्यवस्थापकीय संचालक**
**(डीआयएन : ००५८६७७०)**

**ठिकाण : मुंबई**
**दि. २९.०५.२०२३**

---

## डीजे मीडिया प्रिंट ॲंड लॉजिस्टिक्स लिमिटेड

**सीआयएन : एल ६०२३२एम एच २००९ पीएलसी १९०५६७**
**नोंदणीकृत कार्यालयाचा पत्ता : २४, १ ला मजला, पालखीवाला हाऊस , तारा मंझिल,**
**१ ली धोबी तलाव लेन, मरीन लाईन्स, मुंबई ४०० ००२**
**दूरध्वनी क्रमांक : ०२२- २२००२१३९/ ४०/ ४९ इ मेल : cs@djcorp.in ; संकेतस्थळ : www.djcorp.in**

### १४ वी वार्षिक सर्वसाधारण सभेची सूचना, इ मतदान आणि बुक क्लोजर यांची माहिती

याद्वारे कळविण्यात येते की, कंपनीच्या सभासदांची चौदावी (१४) वार्षिक सर्वसाधारण सभा (एजीएम ) गुरुवार दिनांक २२ जून २०२३ रोजी भारतीय प्रमाण वेळेनुसार संध्याकाळी ४. ०० वाजता व्हिडीओ कॉन्फरन्सिंग (व्हीसी ) / अन्य मान्यताप्राप्त दृकश्राव्य माध्यमे (ओएव्हीएम ) यांच्या माध्यमातून सामायिक ठिकाणी सभासदांच्या प्रत्यक्ष उपस्थितीशिवाय आणि कंपनी कायदा २०१३ च्या आवश्यक आणि लागू असलेल्या तरतुदींच्या अनुसार तसेच त्या अंतर्गत बनविण्यात आलेल्या नियमांच्या अनुसार आणि सिक्युरिटीज ॲंड एक्स्चेंज बोर्ड ऑफ इंडिया (लिस्टिंग ऑब्लिगेशन्स ॲंड डिस्क्लोजर रिक्वायरमेंट्स )नियम २०१५ (लिस्टिंग रेग्युलेशन्स ) तसेच त्यासह वाचा या विषयांच्या संदर्भात जारी करण्यात आलेली परिपत्रके जी कॉर्पोरेट व्यवहार मंत्रालय यांनी जारी केली आहेत त्या अनुसार देण्यात आलेले दिशानिर्देश परिपत्रक क्रमांक १४/ २०२० दिनांकीत ०८ एप्रिल २०२०, परिपत्रक क्रमांक १७/ २०२० दिनांकीत १३ एप्रिल २०२०, परिपत्रक क्रमांक २०/ २०२० दिनांकीत ०५ मे २०२०, परिपत्रक क्रमांक ०२/ २०२१ दिनांकीत १३ जानेवारी २०२१, परिपत्रक क्रमांक २०/ २०२१ दिनांकीत ०८ डिसेंबर २०२१, परिपत्रक क्रमांक २१/ २०२१ दिनांकीत १४ डिसेंबर २०२१, परिपत्रक क्रमांक ०२/ २०२२ दिनांकीत ०५ मे २०२२ रिपत्रक क्रमांक १०/ २०२२ दिनांकीत २८ डिसेंबर २०२२ यांच्या अनुसार व्हीसी / ओएव्हीएम यांच्या माध्यमातून सामायिक ठिकाणी सभासदांच्या प्रत्यक्ष उपस्थितीशिवाय होणार. कंपनी कायदा २०१३ (कायदा) च्या तरतुदींच्या अनुसार तसेच सिक्युरिटीज ॲंड एक्स्चेंज बोर्ड ऑफ इंडिया (सेबी) यांचे परिपत्रक परिपत्रक क्रमांक सेबी / एच ओ / सीएफडी / सीएमडी १/ सीआयआर /पी / २०२०/ ७९ दिनांकीत १२ मे २०२०, परिपत्रक परिपत्रक क्रमांक सेबी / एच ओ / सीएफडी / सीएमडी २/ सीआयआर /पी / २०२१/ ११ दिनांकीत १५ जानेवारी २०२१, आणि परिपत्रक क्रमांक सेबी / एच ओ / सीएफडी / पीओडी - २ १/ पी/ सीआयआर /पी /२०२३/ ४ दिनांकीत ५ जानेवारी २०२३ यांच्या अनुसार सेबी ( लिस्टिंग ऑब्लिगेशन्स ॲंड डिस्क्लोजर रिक्वायरमेंट्स ) नियम २०१५ (लिस्टिंग रेगुलेशन्स ) च्या तरतुदींना कोव्हीड - १९ महामारीच्या पार्श्वभूमीवर सवलती देण्यात आल्या आहेत. कायद्याच्या तरतुदींच्या अनुसार तसेच एमसीए आणि परिपत्रकाच्या अनुसार / लिस्टिंग रेग्युलेशन्सच्या अनुसार कंपनीची वार्षिक सर्वसाधारण सभा व्हीसी / ओएव्हीएम यांच्या माध्यमातून कंपनीच्या १४ व्या वार्षिक सर्वसाधारण सभेच्या सूचनेत नमूद केलेल्या विषयांच्या अनुसार घेण्यात येणार आहे. सभासद वार्षिक सर्वसाधारण सभेला केवळ व्हीसी / ओएव्हीएम यांच्या माध्यमातून उपस्थित राहू शकतात तसेच सहभाग घेऊ शकतात. कायद्याच्या कलम १०३ च्या तरतुदींच्या अनुसार वार्षिक सर्वसाधारण सभेला व्हीसी / ओएव्हीएम यांच्या माध्यमातून उपस्थित असणाऱ्या सभासदांची संख्या गणसंख्या निर्धारित करण्यासाठी गृहीत धरण्यात येईल.

वरील प्रमाणे नमूद केलेल्या परिपत्रकाच्या अनुसार तसेच सेबी परिपत्रकाच्या अनुसार कंपनीने १४ व्या वार्षिक सर्वसाधारण सभेची सूचना आणि वित्तीय वर्ष २०२२-२३ करिताचा वार्षिक अहवाल सभासदांना इलेक्ट्रॉनिक माध्यमातून सोमवार दिनांक २९ मे २०२३ रोजी निर्गमित करण्याची प्रक्रिया अपूर्ण केली आहे आणि वरील प्रमाणे नमूद केलेली प्रपत्रे अशा सभासदांना निर्गमित करण्यात आली आहेत ज्यांचे इ मेल तपशील डिपॉझिटरी पार्टीसिपंटस यांच्याकडे शुक्रवार दिनांक २६ मे २०२३ रोजी नोंदणीकृत करण्यात आले आहेत.

१४ व्या वार्षिक सर्वसाधारण सभेची सूचना आणि वित्तीय वर्ष २०२२- २३ करिताचा अहवाल कंपनीचे संकेतस्थळ www.djcorp.in तसेच स्टॉक एक्स्चेंज संकेतस्थळ म्हणजेच बीएसई लिमिटेड याचे संकेतस्थळ www.bseindia.com आणि सीडीएसएल यांचे संकेतस्थळ www.evotingindia.com येथून डाउनलोड करता येईल.

**दूरस्थ इ मतदान आणि एजीएमच्या दरम्यान मतदान**

कायद्याचे कलम १०८ तसेच त्यासह वाचा कंपनीज (मॅनेजमेंट ॲंड ॲडमिनिस्ट्रेशन ) नियम २०१४ चा नियम २० च्या अनुसार तसेच सेबी (एलोडीआर ) नियम २०१५ आणि सर्वसाधारण सभेच्या संदर्भात आयसीएसआय यांनी जारी केलेले दिशानिर्देश यांच्या अनुसार कंपनीने १४ व्या वार्षिक सर्वसाधारण सभेच्या सूचनेत नमूद केलेल्या विषयांवर सभासदांना वार्षिक सर्वसाधारण सभेच्या पूर्वी (दूरस्थ इ मतदान ) आणि एजीएमच्या दरम्यान इ मतदान सुविधा वापरून मतदानाचा हक्क बजावता यावा यासाठी मतदान सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी सीडीएसएल यांची सेवा घेतली आहे.

| | |
|---|---|
| **दूरस्थ इ मतदानासाठी कट ऑफ तारीख** | गुरुवार १५ जून २०२३ |
| **दूरस्थ इ मतदान प्रारंभ** | सोमवार दिनांक १९ जून २०२३ भारतीय प्रमाण वेळे नुसार सकाळी ९. ०० वाजता |
| **दूरस्थ इ मतदान समाप्ती** | बुधवार दिनांक २१ जून २०२३ भारतीय प्रमाण वेळे नुसार संध्याकाळी ५. ०० वाजता |

केवळ असे सभासद जे वार्षिक सर्वसाधारण सभेला व्हीसी / ओएव्हीएम यांच्या माध्यमातून उपस्थित आहेत आणि ज्यांनी प्रस्तावांवर दूरस्थ इ मतदान पद्धतीने मतदान केलेले नाही किंवा अत्यंत तसे करण्यास मनाई करण्यात आलेली नाही, ते सभासद वार्षिक सर्वसाधारण सभेच्या दरम्यान इ मतदान पद्धतीने होणारी मतदान प्रक्रियेच्या माध्यमातून मतदान करू शकतील. ज्या सभासदांनी दूरस्थ इ मतदान पद्धतीने मतदानाचा हक्क बजावलेला आहे असे सभासद एजीएम ला उपस्थित राहू शकतात मात्र त्यांना पुन्हा मतदान करता येणार नाही.

त्याच प्रमाणे सभासद आपले मतदान दूरस्थ इ मतदान पद्धतीने तसेच एजीएम च्या दरम्यान इ मतदान पद्धतीने सूचनेत नमूद केलेल्या सूचनांचा अवलंब करून करू शकतील. सभासदाने एकदा मतदान केल्यानंतर त्याला त्यात बदल करता येणार नाही.

दूरस्थ इ मतदान प्रक्रिया योग्य आणि पारदर्शक पद्धतीने व्हावी याची छाननी करण्यासाठी छाननी अधिकारी म्हणून कंपनीने श्रीमती एकता अगरवाल, प्रॅक्टिसिंग कंपनी सेक्रेटरी (एसीएस क्रमांक ६५६४० सीओपी क्रमांक २५०९८) यांची नियुक्ती केली आहे. इ मतदानाचे निकाल एजीएम संपल्यानंतर ४८ तासांत जाहीर करण्यात येतील. जाहीर झालेले निकाल आणि छाननी अधिकारी यांचा अहवाल स्टॉक एक्स्चेंज यांना कळविण्यात येईल आणि कंपनीचे संकेतस्थळ www.djcorp.in आणि सीडीएसएल यांचे संकेतस्थळ www.evotingindia.com येथे प्रकाशित करण्यात येईल.

कंपनी कायदा २०१३ चे कलम ९१ च्या अनुसार तसेच कंपनीज (मॅनेजमेंट ॲंड ॲडमिनिस्ट्रेशन ) नियम २०१४ चा नियम १० आणि सेबी (एलोडीआर ) नियम २०१५ चा नियम ४२ च्या अनुसार कंपनीच्या सभासद नोंद पुस्तिका आणि समभाग हस्तांतरण पुस्तिका शुक्रवार दिनांक १६ जून २०२३ ते गुरुवार दिनांक २२ जून २०२३ (दोन्ही दिवस धरून ) या कालावधीत बंद राहतील.

सभासद १४ व्या वार्षिक सर्वसाधारण सभेला व्हीसी / ओएव्हीएम यांच्या माध्यमातून आपले दूरस्थ इ मतदान लॉग इन क्रेडेन्शियल्स वापरून आणि सूचनेत नमूद केलेल्या सूचनांचा अवलंब करून उपस्थित राहू शकतील.

अशी कोणतीही व्यक्ती जी सूचना निर्गमित करण्याची प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर कंपनीचे समभाग घेऊन कंपनीची सभासद झालेली आहे आणि कट ऑफ तारीख म्हणजेच गुरुवार दिनांक १५ जून २०२३ रोजी तिच्याकडे कंपनीचे समभाग असतील तर अशी व्यक्ती helpdesk.evoting@cdslindia.com येथे विनंती पाठवून लॉग इन आयडी आणि पासवर्ड प्राप्त करू शकते. मात्र तो / ती व्यक्ती दूरस्थ इ मतदानासाठी आधीच सीडीएसएल यांच्याकडे नोंदणीकृत असेल तर ती व्यक्ती त्याचा / तिचा सध्याचा युजर आयडी आणि पासवर्ड वापरून मतदानाचा हक्क बजावू शकते.

इ मतदानाच्या संदर्भात ज्या सभासदांना साहाय्याची आवश्यकता आहे ते सभासद सीडीएसएल यांच्याशी helpdesk.evoting@cdslindia.com येथे संपर्क साधू शकतात किंवा १८०० २२ ५५ ३३ येथे संपर्क साधू शकतात.

सभासदांना आवाहन करण्यात येते की त्यांनी एजीएमच्या सूचनेत नमूद करण्यात आलेल्या सूचनांचे काळजीपूर्वक वाचन करावे आणि विशेषतः एजीएमला उपस्थित राहण्याच्या संदर्भातील सूचना, दूरस्थ इ मतदान आणि एजीएमच्या दरम्यान इ मतदान यांच्या संदर्भातील सूचनांचे काळजीपूर्वक वाचन करावे.

**संचालक मंडळाच्या आदेशानुसार**
**डीजे मीडिया प्रिंट ॲंड लॉजिस्टिक्स लिमिटेड यांच्या करिता**
**स्वाक्षरी / -**
**खुशबू महेश लालजी**
**कंपनी सेक्रेटरी आणि कम्प्लायन्स अधिकारी**

**स्थळ : मुंबई**
**दिनांक : २९ मे २०२३**

---

KEMP

## केम्प ॲंड कंपनी लिमिटेड

नोंदणीकृत कार्यालय : पाचवा माळा, डिजीपी हाऊस, ८८-सी, ओल्ड प्रभादेवी रोड, मुंबई - ४०० ०२५.
सीआयएन : एल२४२३९एमएच१९८२पीएलसी०००४७ टेलि : ०२२-६६५३९०००
फॅक्स : ०२२-६६५३९०८९ ई-मेल: kemp-investor@kempnco.com वेबसाइट:www.kempnco.com

**३१ मार्च २०२३ , रोजी संपलेल्या वर्षे पर्यंतचे लेखापरीक्षित आर्थिक निष्कर्ष**

**(Rs in Lakhs)**

| | Particulars | संपलेले तिमाही | संपलेले तिमाही | वर्ष पर्यंतचे |
|---|---|---|---|---|
| | | ३१.०३.२०२३ (लेखापरिक्षित) | ३१.०३.२०२२ (लेखापरिक्षित) | ३१.०३.२०२३ (लेखापरिक्षित) |
| १ | कामकाजातून उत्पन्न | २२७.९९ | २२१.०१ | ५६४.४१ |
| २ | कालावधीकरिता निव्वळ नफा / (तोटा) ( करपूर्व, अपवादात्मक आणि विलक्षण असाधारण बाबींपुर्वी ) | ११६.५३ | १२४.६१ | १२९.७९ |
| ३ | कालावधीकरिता निव्वळ नफा / (तोटा) करपूर्व (अपवादात्मक आणि विलक्षण असाधारण बाबींनंतर) | ११६.५३ | १२४.६१ | १२९.७९ |
| ४ | कालावधीकरिता निव्वळ नफा / (तोटा) करोत्तर (अपवादात्मक आणि विलक्षण असाधारण बाबींनंतर ) | ९७.७७ | १०६.१२ | ११७.३६ |
| ५ | कालावधीकरिता एकूण संयुक्त उत्पन्न (समावेश नफा /( तोटा) करोत्तर) आणि इतर व्यापक उत्पन्न (करोत्तर) | २२१.५७ | ७,३३५.०४ | २,७३०.४४ |
| ६ | समभाग भांडवल | १०८.०२ | १०८.०२ | १०८.०२ |
| ७ | राखीव निधी (पुनर्मुल्यांकनराखीव निधी वगळून अगोदर वर्षाचा ताळेबंदात दर्शविल्यानुसार ) | - | - | २४,४१६.२३ |
| ८ | प्रति समभाग मिळकत (प्रत्येकी १०) चालू आणि बंद ऑपेरेशनसाठी मूळ प्रतिभाग / मिश्रित प्रतिभाग | ९.०५ | ९.८२ | १०.८६ |

**टिपा :**
१) वरील मजकूर सेबी (लिस्टिंग ऑब्लिगेशन्स ॲंड डिस्कलोजर रिक्वायरमेंट्स ) रेग्यूलेशन्स २०१५ च्या रेग्यूलेशन्स ३३ अंतर्गत स्टॉक एक्सचेन्जकडे दाखल केलेल्या तिमाहीच्या वित्तीय निष्कर्षांचा सविस्तर उतारा आहे. तिमाहीच्या वित्तीय निष्कर्षांचा संपूर्ण फॉरमॅट बॉम्बे स्टॉक एक्सचेन्जच्या www.bseindia.com या संकेतस्थळावर आणि www.kempnco.com या कंपनीच्या संकेतस्थळावर सुद्धा उपलब्ध आहे.
२) ३१ मार्च २०२३ रोजी संपलेल्या तिमाही आणि वर्ष पर्यंतचे लेखापरीक्षित वित्तीय निष्कर्ष ३० मे २०२३ रोजी झालेल्या सभेमध्ये संचालक मंडळाने अभिलिखित केले आहेत.
३) ३१ मार्च २०२३ रोजी आर्थिक वर्षासाठी संचालक मंडळाच्या आज झालेल्या बैठकीत सदस्यांनी प्रत्येकी रु १० /- च्या इक्विटी मध्ये रु १२ /- असा अंतिम लाभांश देण्याची शिफारस केली आहे.

केम्प ॲंड कंपनी लिमिटेड
संचालक मंडळाकरिता आणि च्या वतीने

शालिनी डी पिरामल
व्यवस्थापकीय संचालक
डीआयएन - ०१३६५३२८

स्थळ : मुंबई
तारीख :३० मे २०२३

---

## विश्वप्रभा व्हेंचर्स लिमिटेड

*(पूर्वीची विश्वप्रभा ट्रेडिंग लिमिटेड म्हणून ज्ञात)*

**सीआयएन : L51900MH1985PLC034965**

**नोंदणीकृत कार्यालय :** तळमजला, अविघ्न हाइट्स, सर्व्हे क्र. ४५ – ४ बी, सर्वोदय पार्क, नांदिवली रोड, डोंबिवली (पूर्व) – ४२१ २०१.

### दि. ३१.०३.२०२३ रोजी संपलेली तिमाही व वर्षाकरिताच्या लेखापरीक्षित वित्तीय निष्कर्षांच्या अहवालाचा सारांश

**(रु. हजारांत)**

| अ. क्र. | तपशील | स्थायी | | | | | एकत्रित | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | तिमाहीअखेर | | | वर्षअखेर | | तिमाहीअखेर | | | वर्षअखेर | |
| | | ३१.०३.२०२३ लेखापरीक्षित | ३१.१२.२०२२ अलेखापरीक्षित | ३१.०३.२०२२ लेखापरीक्षित | ३१.०३.२०२३ लेखापरीक्षित | ३१.०३.२०२२ लेखापरीक्षित | ३१.०३.२०२३ लेखापरीक्षित | ३१.१२.२०२२ अलेखापरीक्षित | ३१.०३.२०२२ लेखापरीक्षित | ३१.०३.२०२३ लेखापरीक्षित | ३१.०३.२०२२ लेखापरीक्षित |
| १ | परिचालनातून एकूण उत्पन्न (निव्वळ) | २,१०८ | ८८३ | १०,६८४ | १८,३५८ | २४,०२० | २,१०८ | ८८३ | १०,६८४ | १८,३५८ | २४,०२० |
| २ | कालावधीकति निव्वळ नफा/(तोटा) (कर, अपवादात्मक व/वा असामान्य बाबीपूर्व) | (२६०) | (१,०९२) | (१,८५२) | (१४७) | (४,०९४) | (७८१) | (१,०८१) | (१,९२०) | (६९८) | (४,२७०) |
| ३ | करपूर्व कालावधीकरिता निव्वळ नफा/(तोटा) (अपवादात्मक व/वा असामान्य बाबीपश्चात) | (२६०) | (१,०९२) | (१,८५२) | (१४७) | (४,०९४) | (७८१) | (१,०८१) | (१,९२०) | (६९८) | (४,२७०) |
| ४ | करपश्चात कालावधीकरिता नफा/(तोटा) (अपवादात्मक व/वा असामान्य बाबीपश्चात) | (२६०) | (१,०९२) | (१,९५९) | (१४७) | (४,२०१) | (७८१) | (१,०८१) | (२,०२८) | (६९८) | (४,३७७) |
| ५ | कालावधीकरिता एकूण सर्वसमावेशक उत्पन्न (कालावधीकरिताचा (करपश्चात) नफा/(तोटा) व अन्य सर्वसमावेशक उत्पन्न (करपश्चात) यांचा समावेश) | (२६०) | (१,०९२) | (१,९५९) | (१४७) | (४,२०१) | (७८१) | (१,०८१) | (२,०२८) | (६९८) | (४,३७७) |
| ६ | इक्विटी भाग भांडवल (दर्शनी मूल्य प्रत्येकी रु.१०/-) | १७,१५० | १७,१५० | १७,१५० | १७,१५० | १७,१५० | १७,१५० | १७,१५० | १७,१५० | १७,१५० | १७,१५० |
| ७ | अन्य इक्विटी (पुनर्मूल्यांकन राखीव वगळता) | – | – | – | २४,८४६ | २४,९९३ | – | – | – | २४,१३७ | २४,८२४ |
| ८ | उत्पन्न प्रतिशेअर (प्रत्येकी रु. १०/-) (अखंडित वखंडितपरिचालनाकरिता) (अवार्षिकीकृत) | | | | | | | | | | |
| | अ) मूलभूत | (०.१५) | (०.६४) | (४.२७) | (०.०९) | (९.१६) | (०.४५) | (०.६२) | (४.४२) | (०.४०) | (९.४९) |
| | ब) सौम्यीकृत | (०.१५) | (०.६४) | (४.२७) | (०.०९) | (९.१६) | (०.४५) | (०.६२) | (४.४२) | (०.४०) | (९.४९) |

**टीपा :**
१. वरील विवरण हे सेबी (सूची अनिवार्यता व विमोचन आवश्यकता) विनियमन, २०१५ च्या विनियमन ३३ अंतर्गत स्टॉक एक्सचेंजेसकडे दाखल करण्यात आलेल्या तिमाही वित्तीय निष्कर्षांच्या विस्तृत प्रारूपाचा सारांश आहे. तिमाही निष्कर्षांचे संपूर्ण प्रारूप कंपनीची वेबसाइट्.ींळीहींरिलहरींशर्पीीशी.लो वर तसच स्टॉक एक्सचेंज वेबसाइट्.लीशळपवळर.लो वरही उपलब्ध आहे.

**विश्वप्रभा व्हेंचर्स लिमिटेड करिता**
**मितेश ठक्कर**
**व्यवस्थापकीय संचालक**
**(डीआयएन ०६४८०२१३)**

**ठिकाण : डोंबिवली, ठाणे**
**दिनांक : ३०.०५.२०२३**